कार्यालय पोलीस अधीक्षक
दिनांक १३/०९/२०१७

आज दिनांक १३/०९/२०१७ रोजी गडचिरोली येथील महिला महाविद्यालय व स्थानिक गून्हे शाखा,पोलीस अधिक्षक कार्यालय गडचिरोली यांच्या विद्यमानाने सोशल मिडीया/इंटरनेट व्दारे होणारी फसवणूक व महिला विषयक कायदे या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

सदर कार्यशाळेस प्रदिप लांडे पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा, महिला पोलीस उपनिरीक्षक समु रामकिशोर चौधरी, महिला सेल, पोलीस उपनिरीक्षक अनिाश ढमे, सायबर सेल यांनी पुढील विषयावर संभाषण केले आहे. नविन तंत्रज्ञान/गॅझेटचा वापर करतांना कोणती काळजी घेतली पाहीजे तसेच महिलाचे सुरक्षेच्या दृष्टिने काय उपायोजना कोलेल्या आहेत. तसेच स्थागुशा शाखेचे महिला सेलतर्फे राबविण्यात येणार उपक्रम, प्रतिसाद ॲप, दामीनी पथक, महिला हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०९१ या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

हा उपक्रम संपूर्ण जिल्हयात राबवून विद्यार्थामार्फत संपूर्ण जिल्हयात इतर नागरिकांना जागृत करण्याचा मा. पोलीस अधिक्षक, गडचिरोली यांचा मानस आहे असे सांगीतले.

सदर कार्यक्रम महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. हंसा तोमर यांच्या सहकार्याने राबविण्यात आले असून सदर कार्यक्रमाचे संचालन महिला महाविद्यालयाच्या प्राध्यापिका डॉ. प्रज्ञा त्रीपाठी यांनी केले असून प्राध्यापक डॉ. नंदाजी सातपुते यांनी आभार प्रदर्शन केले आहे.

